# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्रमांक :- २/एनजीसी/नियतठेव/२००९/
दिनांक : २०

प्रति,
प्राचार्य,
अभिनव एज्युकेशन सोसायटीचे,
कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी,
एस.नं.२०९, मु.पो.वडवाडी,
ता.खंडाळा जि.सातारा.

विषय : शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून विना-अनुदान तत्त्वावर नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत.
संदर्भ : संदर्भ : शासन निर्णय क्र.टिईएम-२००९(५०/०९)तांशि-४, दि.१२ जून,२००९.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, संदर्भाधिन शासन निर्णयान्वये शासनाने आपणास शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय, खालील अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता | नियतठेवीची रक्कम |
|---|---|---|---|
| १. | कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरींग | ६० | रु. १५.०० लाख (प्रथम वर्ष)<br>रु. १५.०० लाख (द्वितीय वर्ष) |
| २. | इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग | ६० | |
| ३. | इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग | ६० | |
| ४. | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० | |

सदर अभ्यासक्रमासाठी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई संस्थाचालक यांच्या संयुक्त खात्यात नॅशनलाईज किंवा शेड्युल बँकेत प्रथम वर्षासाठी १५.०० लाख व द्वितीय वर्षासाठी रु. १५.०० लाख असे एकूण रु.३०.०० लाख नियत ठेव ५ वर्षासाठी जमा करावी. **(तसेच सदर एफ.डी.मध्ये नांवासमोर प्रथम वर्षासाठी (EN-1st-09) तसेच द्वितीय वर्षासाठी (EN-2nd-09) हा कोड नमूद करण्यात यावा.)** तसेच रुपये १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोदंणीकृत हमीपत्र या संचालनालयास तात्काळ सादर करावे. (सोबत हमीपत्रांच्या मसुद्याची प्रत जोडली आहे.) सदर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी खाली नमुद केलेल्या बाबीची पूर्तता केल्याबाबतची माहिती कागदपत्रांच्या प्रतीसहीत या कार्यालयास त्वरीत सादर करावी.

१. वरील अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकानुसार नियुक्त केलेल्या शिक्षक कर्मचा-यांची माहिती खालील नमुन्यात उपरोक्त रु. १००/- च्या स्टँपपेपरवरील हमीपत्रात समाविष्ट करण्यांत यावी.

| अ.क्र | कर्मचायाचे नांव | शैक्षणिक अहर्ता | पदनाम | नियुक्तीचा दिनांक | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|

२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेचे पत्र, शासन मान्यतेचे प्रत, विद्यापीठाचे मान्यता पत्र इत्यादी पत्रांच्या प्रती.

३. सदर अभ्यासक्रमासाठी नियुक्त करण्यांत आलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची नियुक्ती पत्रे, शैक्षणिक अर्हतेच्या पत्राच्या प्रती तसेच रुजू झाल्याबाबतच्या पत्राच्या प्रती.

४. सदर अभ्यासक्रमासाठी खरेदी करण्यांत आलेल्या पुस्तकांची यादी व त्याबाबत पुरवठादाराला रक्कम अदा केल्याबाबतच्या पावत्यांचा क्रमांक, एकूण रक्कम यांची एकत्रित यादी.

| अ.क्र. | पुरवठादाराचे नांव | खरेदी बिलाचा क्रमांक, दिनांक व रक्कम | पुरवठादाराला रक्कम अदा केलेल्या बिलाचा क्रमांक व दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|

५. सदर अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणारे संगणक व त्यासंबंधीची यंत्रसामुग्री तसेच फर्निचर बाबतची संख्यानिहाय यादी व पुरवठादाराला रक्कम अदा केल्याबाबतच्या पावत्याचा क्रमांक, एकूण रक्कम याची एकत्रित यादी.

| अ.क्र | पुरवठादाराचे नांव | खरेदी बिलाचा क्रमांक, दिनांक व रक्कम | पुरवठादाराला रक्कम अदा केलेल्या बिलाचा क्रमांक व दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|

६. संयुक्त खात्यात नियत ठेव ठेवण्यासाठी बँकेचा फॉर्म व नमुना स्वाक्षरी फॉर्म सादर करावा.

७. सदर अभ्यासक्रमासाठी **शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** यांची संलग्नता घेणे आवश्यक आहे. विद्यापीठाची संलग्नता नसल्यास सदर पदवी अभ्यासक्रमाचा केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत समावेश केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. संलग्नता पत्राची प्रत सोबत जोडण्यात यावी.

वरील बाबींची माहिती सादर केल्यानंतरच अभ्यासक्रम सुरु करण्याची या संचालनालयाची अंतिम परवानगी देण्यात येईल. तसेच सदर अभ्यासक्रमाची फी निर्धारित करण्यासाठी शिक्षण शुल्क समिती यांचे यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा.

आपला

( झेड. ए. शेख )
सहा.संचालक, (अतांत्रिकी)
तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई.

प्रत,

१. मा.कुलगुरु, **शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** यांना मानार्थ सादर त्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त रक्कम संचालकांच्या संयुक्त खात्यात जमा केल्याची खात्री केल्याशिवाय विद्यार्थ्यांचे एनरॉलमेंट करु नये.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, **पुणे** यांना माहितीसाठी.

INCHARGE
PRINCIPAL
ABHINAV EDUCATION SOCIETY'S
COLLEGE OF ENGINEERING &
TECHNOLOGY (DEGREE)
S.NO.209 WADWADI. SATARA